**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ४९/२०२१ मधील नि.क्र. ६० वरील आदेश</u>**

(CNR NO MHRG140004212021)

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ११ ते १६ यांनी त्यांचेविरुध्द पारीत झालेला विना कैफियत आदेश रद्द करुन कैफियत अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्याकरीता दाखल केला आहे.

२. वादीने सदर अर्जावर म्हणणे देवून हरकत घेवून सदरचा अर्ज खारीज करणेबाबत विनंती केली आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने सदरचा दावा हक्क प्रस्थापनेकरीता भाडेपट्टा दस्त व ठरावाकरीता दाखल केला आहे. सदर प्रतिवादी क्र. ११ ते १६ हे दाव्याचे कामी हजर झालेले आहेत. परंतु त्यांनी त्यांची कैफियत मुदतीत दाखल न केल्याने त्यांचे विरुध्द विना कैफियत आदेश पारीत झालेला आहे.

५. सदर प्रतिवादी क्र. ११ ते १६ हे त्यांची कैफियत दाखल करुन दाव्यास विरोध करणार असून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी तसेच प्रकरणांची वाढती संख्या टाळण्याकरीता व सदर दाव्याचा निकाल गुणदोषांवर लावणेकरीता सदर प्रतिवादींविरुध्द न्यायालयाने पारीत केलेला विना कैफियत आदेश रद्द होवून त्यांची कैफियत अभिलेखावर घेणे योग्य होईल. सदर प्रतिवादी

यांनी त्यांची कैफियत मुदतीमध्ये दिली नसल्यामुळे जो असोइस्करपणा झाला त्याकरीता प्रतिवादींना खर्च लावून त्यांचा अर्ज मंजूर केल्यास योग्य व संयुक्तिक होईल. करीता वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## **आदेश**

| | |
|---|---|
| १ | सदरचा अर्ज रक्कम रु. २५०/– च्या खर्चासह मंजूर करणेत येत आहे. |
| २ | प्रतिवादी क्र. ११ ते १६ यांनी रक्कम रु. २५०/– वादी यांना देण्यात यावी. |
| ३ | सदर खर्चाची रक्कम प्रतिवादींनी पुढील नेमल्या तारखेच्या आत वादींना द्यावी अन्यथा सदरचा आदेश रद्द समजणेत येईल. |

ठिकाण – उरण (निलेश म. वाली)

दिनांक – ०२.०१.२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.

<u>नियमित दिवाणी दावा क्र. ४९/२०२१ मधील नि.क्र. ६२ वरील आदेश</u>

(CNR NO MHRG140004212021)

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ११ ते १६ यांनी त्यांस दाव्यास कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. वादीने सदर अर्जावर म्हणणे देवून हरकत घेवून सदरचा अर्ज खारीज करणेबाबत विनंती केली आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने सदरचा दावा हक्क प्रस्थापनेकरीता भाडेपट्टा दस्त व ठरावाकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ११ ते १६ यांचे असे कथन आहे की, त्यांना आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करुन घेण्यास विलंब झाल्यामुळे कैफियत दाखल करण्यास विलंब झालेला आहे.

५. सदर प्रतिवादी क्र. ११ ते १६ हे त्यांची कैफियत दाखल करुन दाव्यास विरोध करत असून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी तसेच प्रकरणांची वाढती संख्या टाळण्याकरीता व सदर दाव्याचा निकाल गुणदोषांवर लावणेकरीता सदर प्रतिवादींना झालेला विलंब माफ करुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेणे योग्य होईल. सदर प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत विलंबाने दिली असल्यामुळे जो असोइस्करपणा झाला त्याकरीता सदर प्रतिवादी यांस खर्च लावून

त्यांचा अर्ज मंजूर केल्यास योग्य व संयुक्तिक होईल. करीता वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १ | सदरचा अर्ज रक्कम रु. २५०/– च्या खर्चासह मंजूर करणेत येत आहे. |
| २ | प्रतिवादी क्र. ११ ते १६ यांनी रक्कम रु. २५०/– वादी यांना देण्यात यावी. |
| ३ | सदर खर्चाची रक्कम प्रतिवादींनी पुढील नेमल्या तारखेच्या आत वादींना द्यावी अन्यथा सदरचा आदेश रद्द समजणेत येईल. |

ठिकाण – उरण (निलेश म. वाली)

दिनांक – ०२.०१.२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.